लोकसत्ता पु-पा-१.

# वाढत्या श्वानदंशांच्या घटनांनी नागरिक त्रस्त

## खासगी रुग्णालयांची माहिती नसल्याने आकडेवारीत तफावत

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** शहरातील वाढत्या श्वानदंशाच्या घटनांनी नागरिक त्रस्त आणि भयभीत झाले आहेत. केवळ पालिकेच्या रुग्णालयातील श्वानदंशाच्या नोंदीच ठेवल्या जात आहेत. खासगी दवाखाने आणि रुग्णालये माहिती देत नसल्याने श्वानदंशाच्या माहितीत तफावत आढळून येत आहे.

पालिकेकडे फक्त पालिका रुग्णालयात आलेल्या रुग्णांची माहिती असते. खासगी रुग्णालयांमध्ये श्वानदंशाच्या उपचारासाठी आलेल्या रुग्णांची माहिती पालिकेला कळवणे बंधनकारक आहे. मात्र खासगी रुग्णालये अशी माहिती पालिकेला देत नाही. पालिकादेखील अशा रुग्णालयांकडून श्वानदंशाची माहिती घेत नाहीत. २०२२ या वर्षात पालिकेकडे असलेल्या रुग्णालयात १२ हजार ३८५ श्वानदंशाच्या घटनांची नोंद झाली तर खासगी रुग्णालयांकडे केवळ २२ घटनांची नोंद आहे. श्वानदंश होणारी व्यक्ती जवळच्या खासगी दवाखाने किंवा रुग्णालयात आधी धाव घेतो. त्यामुळे ती संख्या अधिक असणे आवश्यक आहे. याचाच अर्थ खासगी रुग्णालयांकडील श्वानदंशांची खरी माहिती पालिकेला मिळत नाही.

**श्वानदंशाची पालिकेकडे असलेली माहिती**

| वर्ष | शासकीय | खासगी |
|---|---|---|
| २०१७ | ६ हजार ६२६ | २२ |
| २०१८ | ९ हजार ६०६ | ३० |
| २०१९ | १४ हजार २२५ | १८ |
| २०२० | १२ हजार ४९० | १५ |
| २०२१ | १३ हजार ७६८ | २० |
| २०२२ | १२ हजार ३८५ | १६ |



## जागेअभावी नवीन निर्बीजीकरण केंद्र रखडले

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**वसई:** वसई विरार शहरात दिवसागणिक भटक्या श्वानांचा उपद्रव वाढू लागला आहे. या भटक्या श्वानांना नियंत्रणात आणण्यासाठी पालिकेकडून आणखी नवीन श्वान निर्बीजीकरण केंद्र तयार करण्यात येणार होते. मात्र केंद्र तयार करण्यासाठी पालिकेला जागाच मिळत नसल्याने हे केंद्र रखडले आहे.

वसई, विरार, शहरात भटक्या श्वानांची संख्या वाढू लागली आहे. सैरावैरा फिरणारे भटके श्वान नागरिक व लहान मुले यांच्यावर हल्ला चढवत असल्याच्या घटना समोर येत असतात. तर कधी कधी नागरिकांच्या अंगावर धावून जाण्याचे प्रकार घडतात. यासाठी या श्वानांना आवर घालावा अशी मागणी सातत्याने नागरिकांमधून केली जात आहे. सध्याच्या स्थितीत पालिकेचे नवघर पूर्वेच्या भागात एक श्वान निर्बीजीकरण केंद्र आहे. त्याची क्षमता केवळ १४२ इतकी आहे. श्वानांचा वाढता उपद्रव लक्षात घेता तेसुद्धा अपुरे पडू लागले आहे. यासाठी पालिकेने नवीन निर्बीजीकरण केंद्र तयार करण्याचा निर्णय घेतला होता. मात्र ते उभे करण्यासाठी अजूनही जागाच मिळत नाही. त्यामुळे नवीन निर्बीजीकरण केंद्र रखडले आहे. केंद्र उभारणीचे काम रखडले असल्याने श्वानांचा उपद्रव वाढून श्वानदंश होण्याच्या घटना वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे

> **“ नवीन श्वान निर्बीजीकरण केंद्र तयार व्हावे यासाठी पालिकेकडून प्रयत्न सुरूच आहेत. त्यासाठी जागा उपलब्ध होत नसल्याने अडचणी येत आहेत. जागा मिळाली तर तातडीने नवीन निर्बीजीकरण केंद्र ही सुरू केले जाईल.** – डॉ. चारुशीला पंडित, उपायुक्त वसई- विरार महापालिका

# पोलिस भरती परीक्षेला दोन हजार जणांची दांडी

भाईंदर, ता. ५ (बातमीदार) : मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलिस आयुक्तालयाच्या भरती प्रक्रियेसाठी घेण्यात आलेल्या लेखी परीक्षेत पात्र उमेदवारांपैकी सुमारे दोन हजार उमेदवारांनी दांडी मारल्याचे समोर आले आहे. या लेखी परीक्षेसाठी एकूण १२,१२७ पात्र उमेदवार होते. मात्र भरतीसाठी केवळ ९९९९ उमेदवारच उपस्थित राहिले. ही लेखी परीक्षा कडक पोलिस बंदोबस्तात पार पडली.

लेखी परीक्षेतील पुरुष उमेदवारांसाठी नेताजी सुभाष चंद्र बोस मैदान, तर महिला उमेदवारांसाठी बाळासाहेब ठाकरे मैदान हे ठिकाण ठेवण्यात आले होते. सकाळी सहा वाजल्यापासून परीक्षेची प्रक्रिया सुरू करण्यात आली होती. प्रत्यक्ष परीक्षेसाठी १२१२७ पात्र उमेदवारांपैकी ९९९९ उमेदवारच उपस्थित राहिले. त्यात ८८५८ पुरुष उमेदवारांपैकी ७७२१ जण, तर ३२६९ पात्र महिला उमेदवारांपैकी २२७८ उमेदवारांचा समावेश होता. एवढ्या मोठ्या प्रमाणातील उमेदवारांची परीक्षा घेण्यासाठी अन्य जागा उपलब्ध नसल्यामुळे परीक्षा मैदानात घेण्यात आली; परंतु उमेदवारांची कोणतीही गैरसोय होऊ नये याची पूर्णपणे काळजी घेण्यात आली होती, अशी माहिती पोलिस आयुक्तालयाकडून देण्यात आली. परीक्षेसाठी आलेल्या महिला उमेदवारांसाठी मिरा-भाईंदर महापालिकेने प्रमोद महाजन सभागृह, मीनाताई ठाकरे सभागृह व आप्पासाहेब धर्माधिकारी सभागृह येथे राहण्यासाठी विनामूल्य सुविधा उपलब्ध करून दिली होती.

← सकाळ पु-पा-१.

CS CamScanner

पुढारी पा.नं.५.

# थायलँडला नोकरीचे सांगून पाठवले म्यानमारला

## भाईंदर येथे राहणाऱ्या युवकाची सुखरूप सुटका, भरोसा सेलला यश

**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

भाईंदर येथे राहणाऱ्या युवकाला थायलँड येथे कंपनीत नोकरी देण्याचे सांगून थायलँड येथून बेकायदेशिररीत्या म्यानमार येथे नोकरीला पाठवून त्या ठिकाणी छळ करत होते. त्या युवकाला भारतात पुन्हा यायचे होते परंतु त्याला येता येत नव्हते. त्याची भाईंदर येथील भरोसा सेलने म्यानमार येथून सुखरूप सुटका करत भारतात परत आणण्यास भरोसा सेलला यश मिळाले आहे.

मिरा-भाईंदर भरोसा सेल येथे महिला परवीन शेख (५०) रा. उत्तन, भाईंदर पश्चिम यांनी तक्रार देऊन त्यांचा मुलगा शहजान खान, (२५) यास ठाणे येथील एजंटने थायलंड येथे नोकरी मिळवून देतो असे सांगून ४ नोव्हेंबर २०२२ रोजी प्रथम चेन्नई एअरपोर्ट येथे पाठवून टुरिस्ट व्हिजाच्या माध्यमातून थायलँड येथे पाठवले. त्यानंतर थायलँड येथून बेकायदेशिररित्या या देशातून त्या देशात ( पुशिंग ) दिशाभूल करून म्यानमार येथे पाठवले.

म्यानमार येथील एका कंपनीमध्ये त्याला कॉलींग करण्याचे काम दिले होते. दिलेले टारगेट पूर्ण झाले नाही तर अमानुष छळ केला जात होता. त्याचा मोबाईल काढून घेण्यात आला होता. २८ दिवसानंतर शहजानला अर्ध्या तासासाठी मोबाईल देण्यात आला होता. त्यावेळी त्याने त्याची आई परवीन यांना फोन करून त्याची फसवणूक झाली असून थायलँड येथे नोकरी न देता पुशिंगच्या माध्यमातून त्याला म्यानमार येथे नेल्याचे सांगितले. शहजान याच्यासोबत कोणताही संपर्क होत नसल्यामुळे तो नक्की कुठे आहे व कोणत्या परिस्थितीमध्ये आहे याबाबत परवीन यांना कोणतीही माहिती नव्हती. परदेशात कामानिमित्त गेलेले व अडकून पडलेल्या नागरिकांना भरोसा सेल, भाईंदर यांनी मदत केल्याचे त्यांना माहित होते. त्यामुळे त्यांच्या मुलाला सुखरूप परत भारतात आणण्यासाठी त्यांनी भरोसा सेल येथे तक्रार अर्ज दिला होता. भरोसा सेल येथे परवीन खान यांनी दिलेल्या अर्जाची माहिती वरिष्ठांना देवून त्यांचे मार्गदर्शन व सूचनेप्रमाणे भरोसा सेलच्या सपोनि श्रीमती तेजश्री शिंदे यांनी भारतीय दूतावास यांना संपर्क साधून त्यांचे मदतीने शहजान खान यास ३० मार्च २०२३ रोजी सुखरूप भारत देशात आणण्यात आले. त्यामुळे खान कुटुंबियांनी पोलिसांचे आभार मानले आहेत.

**बेकायदेशीररित्या मुलांना परदेशात पाठवण्याच्या घटना**

मिरा-भाईंदर, वसई-विरार आयुक्तालयाचे वतीने नागरिकांना आव्हान करण्यात येते की, परदेशात नोकरी देतो अशी खोटी बतावणी करून पुशिंगच्या माध्यमातून बेकायदेशीररित्या मुलांना परदेशात पाठवण्याच्या घटना घडत आहेत. त्यामुळे नागरिकांनी या घटनेबाबत दक्षता घेणे आवश्यक आहे. ही कामगिरी अविनाश अंबूरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), अमोल मांडवे, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे), यांचे मार्गदर्शनाखाली भरोसा सेलच्या स.पो.नि. श्रीमती तेजश्री शिंदे, पो.हवा. सचिन तांबवे, म.पो.अं. आफ्रिन जुनैदी यांनी केली आहे.

पुढारी पा.नं.५.

# खुनाच्या गुन्ह्यातील आरोपीस आजन्म कारावासाची शिक्षा

**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

नवघर पोलीस ठाणे हद्दीत २०१८ मध्ये पैशाच्या कारणावरून भावाचा खून करणाऱ्या आरोपीस न्यायालयाने आजन्म कारावासाची शिक्षा सुनावली आहे.

नवघर पोलीस ठाणे हद्दीत दिनांक ४ ऑगस्ट २०१८ रोजी व्हिक्टर रफायल पात्राव यांनी नवघर पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. त्यांचा भाउ सायमन रफायल पात्राव याने भाउ विल्फ्रेड पात्राव याच्या बँक खात्यातून एटीएमव्दारे वीस हजार रुपये काढले म्हणुन विल्फ्रेड पात्राव याने सायमन पात्राव यास खात्यातून पैसे का काढले असे विचारणा केली असता त्यांच्यात भांडण झाले होते. त्यावेळी विल्फ्रेड याने सायमन यास मारण्याची धमकी दिल्याने त्याचा राग मनात धरून भाउ सायमन याने विल्फ्रेड याचे छातीवर सुरीने वार करुन जीवे ठार मारले होते. व मुंडके, डावा हात, दोन्ही हाताचे पंजे धडावेगळे करून प्लास्टीक पिशवीत बांधून टॉयलेटमध्ये लपवुन ठेवले होते.

या घटनेबाबत नवघर पोलीस ठाण्यात ४ ऑगस्ट २०१८ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्यातील आरोपी सायमन रफायल पात्राव (२९) यास तत्कालिन तपासी अधिकारी यांनी गुन्हा दाखल होताच त्याच दिवशी अटक केले होते. या गुन्हयाचा तपास पूर्ण झाल्यानंतर नवघर पोलीस ठाण्याचे तत्कालिन वरिष्ठ पोलीस निरिक्षक राम भालसिंग यांनी मा. जिल्हा न्यायालय, ठाणे येथे दोष-रोप पत्र दाखल केले होते. या आरोपीस बुधवारी मा. जिल्हा न्यायालय, ठाणे नं. ६ च्या मा. रचना तेहरा यांनी दोषी ठरवून कलम ३०२ मध्ये आजन्म कारावास व ५००० रुपये दंड, दंड न भरल्यास सहा महिन्याची साधी कैद तसेच कलम २०१ मध्ये ३ वर्षे सश्रम कारावास व २००० रुपये दंड व दंड न भरल्यास तीन महिने साधी कैद अशी शिक्षा सुनावली आहे.

CamScanner

पुढारी पा.नं.३.

# अनैतिक संबंधात बाधा ठरणाऱ्या पतीचा खून

## पत्नीस तिच्या प्रियकरासह पोलिसांनी ठोकल्या बेड्या

**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

विवाहबाह्य संबंधात अडथळा आणणाऱ्या पतीचा खून केल्या प्रकरणी पत्नी व तिच्या प्रियकराला अटक करण्यात आली आहे. या दोघांनी खून करून अपघाती मृत्यू झाल्याचे भासवले होते.

वालीव पोलीस ठाणे हद्दीत एका महिलेने विवाहबाह्य संबंधातून पतीचा खून केला होता. त्या महिलेला प्रियकरासह वालीव पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाने अटक केली आहे. वालीव पोलीस ठाणे हद्दीत ३१ मार्च रोजी सकाळी ८ च्या पूर्वी वालीव गाव वाघराळपाडा येथील खदानीत सुनीलकुमार मुन्नीलाल दुबे ( ३२ ) याचा मृतदेह मिळून आला. प्रथमदर्शी मयत सुनीलकुमार दुबे हा दारूच्या नशेत खदानीचे पहाडीवरून पाय घसरून खाली पडून मयत झाला असावा, असे गृहीत धरून वालीव पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्युची



नोंद करून चौकशी सुरु करण्यात आली. या अकस्मात मृत्यूच्या चौकशी दरम्यान मयताचे प्रेतावर वैद्यकीय अधिकारी, जे. जे. रुग्णालय, मुंबई येथे शवविच्छेदन केल्यानंतर वैद्यकीय अधिकारी जे. जे. रुग्णालय यांनी मयताच्या मृत्यूचे कारण डोक्याला दुखापत होऊन गळा दाबून मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाल्याने वालीव पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. या गुन्ह्याचे गांभीर्य व संवेदनशीलता लक्षात घेऊन वरिष्ठांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे वालीव पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदारांनी तांत्रिक माहिती व मयत इसम राहणाऱ्या परिसरातील साक्षीदार यांच्याकडून माहिती मिळवली. त्या माहितीच्या आधारे मयत याची पत्नी मुन्नीदेवी दुबे व तिचा प्रियकर संजयकुमार प्रसाद यांच्याकडे तपास केला असता सुनिल दुबे हा त्याची पत्नी मुन्नीदेवी दुबे व संजयकुमार प्रसाद यांचे अनैतिक संबंधात अडथळा आणत असल्याने मुन्नीदेवी सुनीलकुमार दुबे ( २४ ) संजयकुमार चंदेश्वर प्रसाद ( २४ ) दोन्ही रा. वाघराळपाडा वसई पूर्व यांनी आपसात संगनमत करून सुनील यास दारू पाजली व वाघराळ पाडयाच्या खदानीचे पहाडीवरून खाली ढकलून दिले. तरीही सुनिलकुमार दुबे यास मरण न आल्याने संजयकुमार दुबे याने नायलॉनाचे दोरीने गळा आवळून खून केल्याचे सांगितले. या दोन्ही आरोपीस अटक करण्यात आली आहे. या गुन्हाचा पुढील तपास पो.नि. राहुलकुमार पाटील हे करत आहेत. ही कारवाई वालीव पोलीस ठाण्याचे वपोनि कैलास बर्वे, पो.नि. राहुलकुमार पाटील (गुन्हे), सपोनि ज्ञानेश फडतरे, पो.उ.नि. अतुल नाचले, पो.हवा. मुकेश पवार, मनोज मोरे, किरण म्हात्रे, सचिन दोरकर, राजेंद्र फड, सतीश गांगुर्डे यांच्यासह पथकाने केली.

सामना पा.नं.१.

# देशात कोरोना मृत्यूचे प्रमाण २०० टक्क्यांनी वाढले!

## ६ महिन्यांनी दैनंदिन रुग्णसंख्या ४ हजार पार




नवी दिल्ली, दि. ५ (वृत्तसंस्था) – कोरोनाचा धोका वाढत चालला असून चार दिवसांत कोरोना मृत्यूंचे प्रमाण सरासरी २०० टक्क्यांनी वाढले आहे. १ एप्रिल रोजी ५ रुग्ण दगावले होते, तर ही संख्या ४ एप्रिल रोजी १५ वर पोहचली आहे. त्याचवेळी रुग्णवाढही चिंतेत भर टाकणारी असून गेल्या २४ तासांत देशात ४ हजार ४३५ नवीन रुग्णांची नोंद झाली आहे. सहा महिन्यांनंतर प्रथमच दैनंदिन रुग्णसंख्येने चार हजारचा टप्पा ओलांडला आहे.

▪ पान २

### मुंबईत तीन महिन्यांनंतर कोरोना मृत्यू

मुंबईत गेल्या २४ तासांत करण्यात आलेल्या १८९६ कोरोना चाचण्यांमध्ये २२१ बाधित आढळले आहेत. तर तीन महिन्यांनंतर मुंबईत कोरोनामुळे मृत्यू झाला आहे. नव्या रुग्णांमधील १७ जणांना रुग्णालयात दाखल करावे लागले. यातील दोघांना ऑक्सिजनची गरज लागली.

### सुप्रीम कोर्टात ऑनलाईन सुनावणी

कोरोनाचा वाढता धोका लक्षात घेत सर्वोच्च न्यायालयात ऑनलाईन सुनावणीची मुभा सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनी दिली आहे. वर्तमानपत्रांमधील रिपोर्ट्स पाहता देशात कोरोना रुग्णांची संख्या वाढत आहे. अशा परिस्थितीत जर वकील न्यायालयात व्हर्च्युअली हजर राहणार असतील तर ते तसे करू शकतात, असे सरन्यायाधीशांनी सांगितले. त्यामुळे वकिलांना व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे घरातूनच सुनावणीत सहभाग घेता येणार आहे.

पुण्यनगरी पा.नं.३.

# तहसीलदारांचा संप कायम, जनतेची कामे ठप्प

## महसुली कामावर परिणाम; महसूल मंत्र्यांच्या बैठकीत तोडगा नाही

**मुंबई** : राज्यातील २२०० नायब तहसीलदार व या संवर्गातून पदोन्नती झालेले ६६० तहसीलदार आणि २०० प्रांत (उपजिल्हाधिकारी) वेतनश्रेणीत सुधारणा करण्याच्या मागणीसाठी गेल्या तीन दिवसांपासून संपावर गेल्याने जनतेची कामे ठप्प होण्याबरोबरच महसुली कामावर परिणाम झाला आहे. दरम्यान, महसूल मंत्री विखे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयातील बैठकीत कोणताही तोडगा निघाला नाही. महसूल मंत्र्यांनी कर्मचारी संघटनेच्या मागण्या मान्य करून मुख्यमंत्र्यांच्या कोर्टात चेंडू ढकलला आहे.

राज्यातील महसूल यंत्रणेचा कणा असलेले नायब तहसीलदार यांना राजपत्रित वर्ग-२ चा दर्जा दिला आहे. पण, त्यानुसार वेतनश्रेणी (ग्रेड पे) दिली जात नाही. याबाबत शासनाकडे वेळोवेळी मागणी केली, पण दखल घेतली नाही. नायब तहसीलदारांनी आपल्या मागण्यांकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी ३ मार्च रोजी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले. तर १३ मार्च रोजी सामूहिक रजा आंदोलन केले होते. अखेर सोमवारपासून नायब तहसीलदार व त्या संवर्गातून पदोन्नतीद्वारे तहसीलदार व प्रांत झालेले अधिकारी संपावर गेले आहेत.

नायब तहसीलदारांच्या संपावर तोडगा काढण्यासाठी मंत्रालयात महसूल मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्यासमवेत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीला विभागाचे अपर मुख्य सचिव नितीन करीर आणि महाराष्ट्र राज्य तहसीलदार व नायब तहसीलदार संघटनेचे कार्याध्यक्ष सुरेश बगळे यांच्यासह सदस्य उपस्थित होते. मात्र, या बैठकीत कोणताही तोडगा निघू शकला नाही. नायब तहसीलदार यांचा ग्रेड पे वाढवण्याबाबत शासन सकारात्मक आहे. महसूल विभागाला त्यांच्या मागण्या मान्य असून, मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांशी चर्चा करून लवकरच निर्णय घेण्यात येईल, असे सांगून संप मागे घेण्याचे आवाहन मंत्री विखे-पाटील यांनी केले.

### निर्णय होईपर्यंत संप मागे घेणार नाही

नायब तहसीलदारांच्या वेतनश्रेणी वाढीबाबत महसूल मंत्र्यांसोबत सकारात्मक चर्चा झाली असली तरी जोपर्यंत निर्णय घेतला जात नाही, तोपर्यंत संप कायम राहील. शासन कायमच आश्वासन देत आले आहे, त्यामुळे निर्णय झाल्याशिवाय संप मागे घेणार नसल्याचे महाराष्ट्र राज्य तहसीलदार-नायब तहसीलदार संघटनेचे कार्याध्यक्ष सुरेश बगळे यांनी दै. 'पुण्य नगरी'शी बोलताना सांगितले.

लोकमत पा.नं.२.

# १३ वर्षांच्या मुलाची केस कापल्याने आत्महत्या

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड** : केस बारीक कापले म्हणून रागावलेल्या १३ वर्षीय मुलाने १६ व्या मजल्यावरून उडी मारून आत्महत्या केल्याची घटना भाईंदरमध्ये मंगळवारी रात्री उशिरा घडली आहे.

भाईंदर पूर्वेला न्यू गोल्डन परिसरात सोनम इंद्रप्रस्थ इमारतीच्या १६ मजल्यावर पाठक कुटुंब राहते. या कुटुंबातील आठवीत शिकणारा शत्रुघ्न राजीव पाठक या १३ वर्षांच्या मुलास त्याच्या सख्ख्या चुलत भावाने केस कापण्यास नेले होते. मात्र, केस बारीक कापल्याने तो रागावला. घरातल्यांनी त्याची समजूत काढली. अखेर मंगळवारी रात्री साडेअकराच्या सुमारास शत्रुघ्नने बाथरूममधील छोट्याशा खिडकीतून उडी मारून आत्महत्या केली. नवघर पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद झाली असून वरिष्ठ पोलिस निरीक्षक विजय पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक संदीप पालवे अधिक तपास करत आहेत. शत्रुघ्न हा पाठक यांचा सर्वात लहान मुलगा होता. त्याला दोन मोठ्या बहिणी आहेत.

CamScanner

लोकमत पु-पा-१.

# विद्यार्थ्यास मारणाऱ्या खासगी शिक्षकावर गुन्हा

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** भाईंदर पश्चिमेस एका खासगी शिकवणी चालवणाऱ्या शिक्षकाने १२ वर्षांच्या विद्यार्थ्यास अभ्यास केला नाही म्हणून मारल्याप्रकरणी अखेर भाईंदर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

भाईंदर पश्चिमेस वैशाली हॉटेलजवळ असलेल्या स्कॉलिस्टिक अकॅडमी या संचित अग्रवाल यांच्या खासगी क्लासमध्ये पीडित १२ वर्षीय अल्पवयीन विद्यार्थी शिकण्यास जातो. ३१ मार्चला शिकवणीत गेलेला मुलगा घरी रडत-रडत आल्याचे कळल्याने वडिलांनी मुलाची विचारपूस केली. संचित अग्रवाल याने कानावर जोराने मारल्याचे मुलाने सांगितले. वडिलांनी अग्रवाल याला कॉल केला असता मुलाने अभ्यास केला नाही म्हणून मारल्याचे कारण दिले. मुलाला भाईंदर पोलिस ठाण्यात नेऊन नंतर भीमसेन जोशी सरकारी रुग्णालयात उपचारासाठी नेले. तेथे कानाच्या डॉक्टरकडे जाण्यास सांगितले. त्यावेळी पोलिसांनी अदखलपात्र गुन्हा दाखल केला होता. कानाच्या डॉक्टरने तपासून कानाच्या पडद्यावर सूज आली व त्याला कमी ऐकू येत असल्याचा अहवाल दिला. त्यानंतर भाईंदर पोलिसांनी संचित अग्रवाल विरुद्ध विद्यार्थ्यास मारहाण केल्याप्रकरणी ३ एप्रिलला गुन्हा दाखल केला आहे.

# काशिमिऱ्यात मोबाइल, इलेक्ट्रॉनिक वस्तूंची चोरी

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** रस्त्यावर उभ्या केलेल्या टेम्पोचे टाळे फोडून त्यातील मोबाइल, इतर विजेची उपकरणे असा २१ लाख ९१ हजारांचा ऐवज चोरून नेल्याची घटना घडली आहे. भिवंडी येथून भाईंदरमधील क्रोमा इलेक्ट्रॉनिक्समध्ये हा माल आणण्यात येत होता. या प्रकरणी काशिमिरा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

मीरा रोडला राहणारे अनिकेत नवनाथ पवार यांचा ट्रान्सपोर्टचा व्यवसाय आहे. त्यांच्या टेम्पोतून ही मालवाहतूक करण्यात येत होती. टेम्पोचालक योगेश कांबळे याने भिवंडी येथून सामान आणून ३० मार्चला रात्री टेम्पो पेणकरपाडा येथील गणेश मंदिराजवळ रस्त्यावर उभा केला होता.




सकाळी टेम्पोच्या दाराचे लॉक तोडलेले व आतमध्ये मोबाइल, आदींचे रिकामे खोके सापडले. चोरट्याने टेम्पोच्या दाराचे लॉक तोडून आतील मोबाइल, वॉच, पेन ड्राइव्ह, हेअर ड्रायर, इलेक्ट्रॉनिक घड्याळ, हार्ड डिस्क, आदी २१ लाख ९१ हजार रुपयांच्या वस्तू चोरल्या आहेत. पवार यांच्या फिर्यादीवरून १ एप्रिलला काशिमिरा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. वरिष्ठ पोलिस निरीक्षक संदीप कदम हे तपास करीत आहेत.

CamScanner

# Life term for killing brother, chopping body

**SURESH GOLANI**
MIRA-BHAYANDAR

Five years after he killed his elder brother and chopped his body into pieces, the district sessions court, Thane. convicted Simon Raphael Patrao, 29, and sentenced him to life imprisonment on Wednesday.

The murder reported on August 4, 2018, from Bhayandar, was the fallout of a dispute over Rs20,000 which the accused had withdrawn from the ATM using his elder brother Wilfred Patrao's debit card without his knowledge. This apparently became the reason for the conflict between them. In a fit of rage, Simon stabbed Wilfred to death with a knife, dismembered the body parts and stuffed them into plastic bags before hiding them in the bathroom and bedroom of the apartment. After committing the crime, Simon reportedly called up his Dubai-based brother who advised him to surrender before the police. Simon was arrested on the same day. Their eldest brother was the complainant in the case. Simon was also sentenced to three years of rigorous imprisonment after finding him guilty of causing the disappearance of evidence of the offence. He was also been fined Rs5,000 and Rs2,000 in both convictions, failing which he will have to spend more rigorous time in jail.

CamScanner

# Wife, paramour held for killing husband

**FPJ NEWS SERVICE**
**MIRA-BHAYANDAR**

Three days after police found the body of a 32-year-old man from a quarry in the Waghralpada area of Vasai East, the crime detection unit of the Mira Bhayandar-Vasai Virar (MBVV) police arrested a 24-year-old woman and her paramour on charges of murder.

According to the police, the body of the deceased Sunilkumar Munnilal Dubey, was recovered at around on March 31. Initially, a case for accidental death was registered. However, the autopsy reports revealed an unnatural death as Dubey had died due to strangulation and head injuries, following which a murder case was lodged. The crime detection team learned that the victim's wife Munnidevi Sunil Kumar Dubey, 24, was having an illicit relationship with Sanjaykumar Chandreshwar Prasad, 24. Both confessed to their crime.

CamScanner

पुढारी

# अवैध रेतीमाफियांवर कारवाई




**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

मिरा-भाईंदर शहरातील उत्तन, भाईंदर पश्चिम, घोडबंदर या ठिकाणी गेल्या अनेक दिवसांपासून अवैध मार्गाने खाडी पात्रातील व समुद्रातील रेती सेक्शन पंपाच्या साहाय्याने रेती काढली जात आहे. चोरट्या मार्गाने रेती माफियांनी उच्छाद मांडला आहे. घोडबंदर येथे महसूल विभागाने कारवाई करून १८० ब्रास रेतीसाठा उद्ध्वस्त करत जेसीबीच्या साहाय्याने खाडी पात्रात टाकला आहे.

मिरा-भाईंदर शहरात चोरट्या मार्गाने बाहेरून रेती आणली जाते. तसेच समुद्रातून व घोडबंदर खाडीतून रेती काढली जाते. समुद्रातील व खाडीतील अवैध मार्गाने बेसुमार रेती उपसा करून पर्यावरणाचा ऱ्हास केला जात आहे. महसूल विभागाकडून रेती चोरणाऱ्यावर व रेती उपसा करणाऱ्यावर कारवाई केली जाते परंतु कठोर कारवाई होत नसल्याने रेती चोरीच्या प्रमाणात वाढ होत आहे. मिरा-भाईंदरमध्ये समुद्रकिनाऱ्यासह खाडीपात्रात बेसुमार उत्खनन (उपसा) सुरू आहे. गेल्या काही महिन्यांपासून जिल्हाधिकारी ठाणे व अपर तहसीलदार यांच्याकडे अवैध रेती प्रकरणी तक्रारी आल्या होत्या. घोडबंदर खाडी पात्रात अवैध रेती उत्खनन आणि वाहतूक सुरू असून त्यावर कारवाई करण्याचे आदेश उपजिल्हाधिकारी अविनाश शिंदे यांनी नायब तहसीलदार, मंडळ अधिकारी यांना दिले होते. त्यानुसार मंडळ अधिकारी व तलाठी अभिजित बोडके, नितीन पिंगळे सह घोडबंदर येथील रेती बंदरात ३ एप्रिल रोजी छापा टाकला. त्यावेळी त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात अवैध रेतीसाठा आढळून आला. तेथे आढळून आलेल्या जवळपास १८० ब्रास रेतीसाठा जेसीबीच्या मशीनच्या साहाय्याने खाडी पात्रात टाकून रेती साठा नष्ट केला आहे. या ठिकाणी सुरू असलेल्या रेती उपसा करणाऱ्याबरोबर महसूल विभागाचा आशीर्वाद असल्याची चर्चा सुरू आहे. या कारवाई वेळी त्या ठिकाणी दोन डंपर अवैध रेती वाहतूक करताना आढळून आले. या कारवाईदरम्यान ते डंपर जप्त करण्यात आले आहेत.

Thane Edition
Apr 6, 2023 Page No. 7
newspaper.pudhari.co.in

CamScanner

पुढारी

# अनैतिक संबंधात बाधा ठरणाऱ्या पतीचा खून

## पत्नीस तिच्या प्रियकरासह पोलिसांनी ठोकल्या बेड्या

**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

विवाहबाह्य संबंधात अडथळा आणणाऱ्या पतीचा खून केल्या प्रकरणी पत्नी व तिच्या प्रियकराला अटक करण्यात आली आहे. या दोघांनी खून करून अपघाती मृत्यू झाल्याचे भासवले होते.

वालीव पोलीस ठाणे हद्दीत एका महिलेने विवाहबाह्य संबंधातून पतीचा खून केला होता. त्या महिलेला प्रियकरासह वालीव पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाने अटक केली आहे. वालीव पोलीस ठाणे हद्दीत ३१ मार्च रोजी सकाळी ८ च्या पूर्वी वालीव गाव वाघराळपाडा येथील खदानीत सुनीलकुमार मुन्नीलाल दुबे ( ३२ ) याचा मृतदेह मिळून आला. प्रथमदर्शी मयत सुनीलकुमार दुबे हा दारूच्या नशेत खदानीचे पहाडीवरून पाय घसरून खाली पडून मयत झाला असावा, असे गृहीत धरून वालीव पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्युची



नोंद करून चौकशी सुरु करण्यात आली. या अकस्मात मृत्यूच्या चौकशी दरम्यान मयताचे प्रेतावर वैद्यकीय अधिकारी, जे. जे. रुग्णालय, मुंबई येथे शवविच्छेदन केल्यानंतर वैद्यकीय अधिकारी जे. जे. रुग्णालय यांनी मयताच्या मृत्यूचे कारण डोक्याला दुखापत होऊन गळा दाबून मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाल्याने वालीव पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. या गुन्ह्याचे गांभीर्य व संवेदनशीलता लक्षात घेऊन वरिष्ठांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे वालीव पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदारांनी तांत्रिक माहिती व मयत इसम राहणाऱ्या परिसरातील साक्षीदार यांच्याकडून माहिती मिळवली. त्या माहितीच्या आधारे मयत याची पत्नी मुन्नीदेवी दुबे व तिचा प्रियकर संजयकुमार प्रसाद यांच्याकडे तपास केला असता सुनिल दुबे हा त्याची पत्नी मुन्नीदेवी दुबे व संजयकुमार प्रसाद यांचे अनैतिक संबंधात अडथळा आणत असल्याने मुन्नीदेवी सुनीलकुमार दुबे ( २४ ) संजयकुमार चंदेश्वर प्रसाद ( २४ ) दोन्ही रा. वाघराळपाडा वसई पूर्व यांनी आपसात संगनमत करून सुनील यास दारू पाजली व वाघराळ पाडयाच्या खदानीचे पहाडीवरून खाली ढकलून दिले. तरीही सुनिलकुमार दुबे यास मरण न आल्याने संजयकुमार दुबे याने नायलॉनाचे दोरीने गळा आवळून खून केल्याचे सांगितले. या दोन्ही आरोपीस अटक करण्यात आली आहे. या गुन्हाचा पुढील तपास पो.नि. राहुलकुमार पाटील हे करत आहेत. ही कारवाई वालीव पोलीस ठाण्याचे वपोनि कैलास बर्वे, पो.नि. राहुलकुमार पाटील (गुन्हे), सपोनि ज्ञानेश फडतरे, पो.उ.नि. अतुल नाचले, पो.हवा. मुकेश पवार, मनोज मोरे, किरण म्हात्रे, सचिन दोरकर, राजेंद्र फड, सतीश गांगुर्डे यांच्यासह पथकाने केली.

Thane Edition
Apr 6, 2023 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

CamScanner

पुढारी

# खुनाच्या गुन्ह्यातील आरोपीस आजन्म कारावासाची शिक्षा

**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

नवघर पोलीस ठाणे हद्दीत २०१८ मध्ये पैशाच्या कारणावरून भावाचा खून करणाऱ्या आरोपीस न्यायालयाने आजन्म कारावासाची शिक्षा सुनावली आहे.

नवघर पोलीस ठाणे हद्दीत दिनांक ४ ऑगस्ट २०१८ रोजी व्हिक्टर रफायल पात्राव यांनी नवघर पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. त्यांचा भाउ सायमन रफायल पात्राव याने भाउ विल्फ्रेड पात्राव याच्या बँक खात्यातून एटीएमव्दारे वीस हजार रुपये काढले म्हणुन विल्फ्रेड पात्राव याने सायमन पात्राव यास खात्यातून पैसे का काढले असे विचारणा केली असता त्यांच्यात भांडण झाले होते. त्यावेळी विल्फ्रेड याने सायमन यास मारण्याची धमकी दिल्याने त्याचा राग मनात धरून भाउ सायमन याने विल्फ्रेड याचे छातीवर सुरीने वार करुन जीवे ठार मारले होते. व मुंडके, डावा हात, दोन्ही हाताचे पंजे धडावेगळे करून प्लास्टीक पिशवीत बांधून टॉयलेटमध्ये लपवुन ठेवले होते.

या घटनेबाबत नवघर पोलीस ठाण्यात ४ ऑगस्ट २०१८ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्यातील आरोपी सायमन रफायल पात्राव (२९) यास तत्कालिन तपासी अधिकारी यांनी गुन्हा दाखल होताच त्याच दिवशी अटक केले होते. या गुन्हयाचा तपास पूर्ण झाल्यानंतर नवघर पोलीस ठाण्याचे तत्कालिन वरिष्ठ पोलीस निरिक्षक राम भालसिंग यांनी मा. जिल्हा न्यायालय, ठाणे येथे दोष-रोप पत्र दाखल केले होते. या आरोपीस बुधवारी मा. जिल्हा न्यायालय, ठाणे नं. ६ च्या मा. रचना तेहरा यांनी दोषी ठरवून कलम ३०२ मध्ये आजन्म कारावास व ५००० रुपये दंड, दंड न भरल्यास सहा महिन्याची साधी कैद तसेच कलम २०१ मध्ये ३ वर्षे सश्रम कारावास व २००० रुपये दंड व दंड न भरल्यास तीन महिने साधी कैद अशी शिक्षा सुनावली आहे.

Thane Edition
Apr 6, 2023 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

CamScanner

लोकमत

# प्रियकराच्या मदतीने प्रेमात अडथळा ठरलेल्या पतीचा काढला काटा

## पत्नी फरार : वसईच्या वाघराळपाड्यातील धक्कादायक घटना

**लोकमत न्यूज नेटवर्क**

**नालासोपारा :** वाघराळपाडा पहाडीवरून खाली पडल्याने ३० मार्चला एकाचा अपघातात मृत्यू झाल्याप्रकरणी वालीव पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली होती. मात्र, तपासादरम्यान हा अपघात नसून हत्या असल्याचा उलगडा पोलिसांनी केला आहे. या हत्येप्रकरणी सोमवारी गुन्हा दाखल करून आरोपी प्रियकराला अटक केली आहे, तर फरार पत्नीचा शोध घेत पुढील तपास सुरू आहे.




> वालीव पोलिसांनी सोमवारी दोन आरोपींविरोधात हत्या व पुरावा नष्ट केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करून आरोपी संजयकुमारला अटक केली आहे. आरोपीला वसई सत्र न्यायालयात हजर केले असता पाच दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे. - चंद्रकांत जाधव, सहायक पोलिस आयुक्त

३० मार्चला रात्री सुनीलकुमार मुन्नीलाल दुबे याचा वाघराळपाडा पहाडीवरून खाली पडल्याने मृत्यू झाला होता. सुनीलकुमार याला दारूचे व्यसन असल्यामुळे त्या नशेत तोल जाऊन तो खाली पडल्याने त्याचा मृत्यू झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला होता. याप्रकरणी वालीव पोलिसांनी ३१ मार्चला आकस्मिक मृत्यूची नोंद केली होती. सुनीलकुमारचा मृतदेह पंचनामा करून विच्छेदनासाठी पाठवला होता. वरिष्ठ पोलिस निरीक्षक कैलास बर्वे यांना संशय आल्याने तपास अधिकाऱ्याला योग्य चौकशी करण्यासाठी सांगितले.

पोलिस तपासात हा अपघात नसून हत्या असल्याचे उघडकीस आले आहे. त्या गुन्ह्याबाबत वेगवेगळ्या दृष्टीने पोलिसांनी तपासाला सुरुवात केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मृत सुनीलकुमार यांची पत्नी मुन्नीदेवी दुबे (२१) हिचे परिसरातील संजयकुमार चंदेश्वर प्रसाद (२४) याच्यासोबत प्रेमसंबंध होते. प्रेमसंबंधात पतीच अडथळा व त्रास होत असल्यामुळे मुन्नीदेवी हिने संजयकुमार याच्या मदतीने त्याचा काटा काढण्याचे ठरवले. घटनेच्या दिवशी संजयकुमारने सुनीलकुमारला वाघराळपाडा पहाडीवर नेले. तेथे त्याला दारू पाजून नंतर पहाडीवरून खाली ढकलून दिले. त्यानंतरही सुनील जिवंत असल्याचे लक्षात आल्यावर आरोपी संजयने दोरीने त्याचा गळा आवळून त्याची हत्या केली होती.



CamScanner

लोकमत

# तीनपत्ती जुगाऱ्यांवर कारवाई

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : नालासोपाऱ्यात तीनपत्ती जुगार खेळणाऱ्या जुगाऱ्यांवर कारवाई करण्यात आली आहे. या प्रकरणी नालासोपारा पोलिस अधिक तपास करीत आहेत.

वाघेश्वरी हिल येथील देवांग गुलाबदास देवडा यांच्या मालकीच्या न्यू अटलांटा सोसायटीत ए विंगमधील तिसऱ्या मजल्यावर मंगळवारी संध्याकाळी सहाच्या सुमारास तीनपत्ती जुगार खेळला जात असल्याची माहिती नालासोपारा पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार, पोलिसांनी या ठिकाणी धाड टाकली असता, आरोपी देवां देवडा, अल्पेश मेहता, पिंकल बगडिया, महेश शेट्टी, राजन मेहरा, शिवम गुज्ज व राजाराम निमकरडे हे सात ज बेकायदेशीररीत्या पैसे लावून तीनपत्त जुगार खेळत असताना रंगेहा आढळून आले. त्यांच्याकडून रो रक्कम व दुचाकी असा ६८ हजार ३० रुपये किमतीचा मुद्देमाल ज करण्यात आला होता. पोलिसांनी महाराष्ट्र जुगारबंदी अधिनिय कलमाखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सातही आरोपींना नोटिस बजावण्यात आल्या आहेत.

Hello Vasai
Page No. 1 Apr 06, 2023
Powered by: erelego.com

CS CamScanner